# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 176/2024 दिनांक : 19.05.2024

## 1)जबरी चोरी :—

**हिमायतनगर** :—दिनांक 17.05.2024 रोजी 20.45 वा. ते 21.00 चे दरम्यान, **हिमायतनगर ते भोकर जाणारे रोडवर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे आपले मोटार सायकलवर जात असताना यातील अनोळखी चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीची मोटारसायकल अडवुन चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीचा व त्यांचे मित्राचा मोबाईल असे दोन मोबाईल फोन किंमती 22,000/—रूपयाचे व खिशातील नगदी 13,000/—रूपये असा एकुण किंमती 35,000/—रूपयाचा माल बळजबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी प्रल्हाद भाउराव मिरासे, वय 38 वर्षे, व्यवसाय नोकरी रा. वडगाव खु. ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 35/2024 कलम 392, 341, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि/ कदम, मो. नं. 9922660412** हे करीत आहेत.

## 2)चोरी :—

**भाग्यनगर** :— दिनांक 17.05.2024 रोजी 12.30 वा. ते 13.00 वा. चे दरम्यान, **बि.के.हॉल इन्फीनिटी स्टडी पॉइट नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांची एक काळया रंगाची बॅग त्यामध्ये एक I pad apple कंपनीचा व तीन चार्जर, एअर बड, पुस्तके असा एकुण किंमती 22,000/—रूपये मुद्देमाल नमुद ठिकाणा वरून कोणीतरी अज्ञात चोरटयानी चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सुहास बालाजी सरपाते, वय 18 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. शिवनेरी नगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 205/2024 कलम 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/वसमतकर, मो. नं. 9823362226** हे करीत आहेत.

## 3)जनावर चोरी :—

**कंधार** :— दिनांक 17.05.2024 रोजी 18.00 वा. ते दिनांक 18.05.2024 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **मौजे. कौठा .ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे शेतात आखाडयावर बांधलेला दोन जनावरे एक गाय व एक कारवड एकुण किंमती 30,000/—रूपयाचे जनावरे नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी मल्लीकार्जुन विष्वनाथ कापसे, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. कौठा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 161/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/गिते, मो.क्रं. 8007807771** हे करीत आहेत.

## 4)फसवणुक :—

**शिवाजीनगर** :— दिनांक 16.05.2024 रोजी 17.20 वा. ते 17.35 वा. चे दरम्यान, **गुंडेगावकर पेट्रोलपंपाचे बाजुस ATM नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी पैसे काढण्यासाठी गेले असता एका अनोळखी आरोपीने पैसे काढुन देतो असे म्हणुन फिर्यादीच्या हातातील ATM कार्ड घेवुन दिशाभुल करून कार्ड बदली करून वेगवेगळया ATM मधुन रक्कम काढुन व कार्डव्दारे शॉपींग करून एकुण 57,897/—रूपये काढुन अनोळखी आरोपीने फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी गोविंद जिवनाजी वैजाळे, वय 45 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. तळेगाव ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं. 169/2024 कलम 420 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1007 झांबरे, मो. क्रं. 9923922533** हे करीत आहेत.

## 5)शासकीय कामात अडथळा :—

**भोकर** :— दिनांक 18.05.2024 रोजी 17.15 वा. चे सुमारास, **आरोपीच्या घरासमोर सोमठाणा फाटा ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे अर्जातील आरोपी च्या घरासमोर जावुन त्यास घडलेल्या घटनेबाबत विचारपुस करीत असताना यातील नमुद आरोपीने तु माझे घरी कसे काय येतो असे म्हणुन अश्लील भाषेत शिवीगाळ करून फिर्यादीचे शर्टाचे कॉलर पकडुन त्यांच्या डाव्या कानाला चावा घेवुन कानास गंभीर दुखापत केली व डोक्यात लाकडाने मारून जखमी केले व फिर्यादी करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2820 भिमराव उमला जाधव ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्याद वरुन **पोस्टे भोकर** गुरनं 148/2024 कलम 353,333,294,504,506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कराड, मो.क्रं. 9823714385** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 11.01.2024 ते दिनांक 15.02.2024 पावेतो चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी व्यंकटेश नगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड ह.मु. दिक्षानगर नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस नौकरीसाठी माहेरहुन 7,00,000/– रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 23 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 388/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1238 मुपडे ,मो.क्रं. 9822441238** हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :–

**वजिराबाद :–**दिनांक 18.05.2024 रोजी 15.10 वा. चे सुमारास, **मार्कण्डेय मंदिर देगावचाळ समोर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक गावठी पिस्टल (अग्नीशस्त्र) सह सहा जिवंत काडतुस किंमती 41,200/–रूपयाचा माल ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री राजु दताराव वटाणे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 227/2023 कलम 3/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री किरवले, मो.क्र. 9922101100** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :–

**1)बिलोली :–** दिनांक 18.05.2024 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **मौ.आरळी लिंबाच्या झाडाखाली ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3360/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2243 मधुकर मारोती टोणगे, ने. स्थागुशा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 80/2024 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2320 शिंदे, मो.नं. 9823633820** हे करीत आहेत.

**2)मुक्रामाबाद :–** दिनांक 18.05.2024 रोजी 17.15 वा. चे सुमारास, **मौ. बाऱ्हाळी प्रकाश नगर ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 5000/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/ताहेर गुलामनबी शेख, ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 80/2024 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/ ताहेर शेख, मो.नं. 8421467070** हे करीत आहेत.

**3)मुदखेडः–** दिनांक 18.05.2024 रोजी 12.10 वा. चे सुमारास, **शिवाजीनगर, मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या बियर बॉटल किंमती 2280/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/699 रमेश दादाराव बोईनवाड, ने. पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 71/2024 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेका/1375 ठाकुर, मो.नं. 7774051375** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड